सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


## वाहनचालकांचे दरपत्रक

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या ३ सदस्य आणि १ सचिव अशा एकूण ४ अधिकाऱ्यांसाठी ४ वाहनचालकांची पदे एका वर्षाच्या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेद्वारे (Outsourcing) वाहनचालकांचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांकडून खालील दिलेल्या तत्क्यात दि. १०/०४/२०२२ पर्यंत मोहरबंद लिफाफ्यात वाहनचालकाच्या दरांबाबतची दरपत्रके (Quotations) प्राधिकरण कार्यालयाच्या पत्त्यावर मागविण्यात येत आहेत. कराराच्या अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत:-

## वाहनचालकाचे दर

| अ.क्र. | पुरवठादाराचे नाव | वाहनचालकाचे प्रतिमाह दर | अतिकालिक भत्ता (प्रति तास) | | कर असल्यास | इतर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुंबईमध्ये | मुंबई बाहेर | | | |
| | | | | | | | |

स्थळ:- मुंबई
दिनांक:- २५/ ०३/२०२२

(डॉ. रामनाथ सोनवणे)
सचिव, मजनिप्रा

D:\C DISK BACKUP ९/८.२०२१\Arun\Desktop\शिवाजी धामणकर\Arunsir\AllAMC\वा. कृष्णा मोटर्स.docx

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई

## <u>कंत्राट तत्त्वावर वाहनचालकांची सेवा पुरविण्याबाबतच्या अटी व शर्ती:-</u>

१. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणातील सेवा ही पूर्णपणे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपाची असून वाहनचालकांना भविष्यात या पदावर नियुक्तीचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. त्यामुळे वाहनचालकांच्या सेवेचे कोणतेही उत्तर दायित्व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर राहणार नाही.

२. वाहनचालक किमान दहावी /बारावी इयत्ता उत्तीर्ण असावा, तसेच तो भारतीय नागरीक असावा. वाहनचालकास मराठी लिहिता, वाचता येणे आवश्यक राहील. तसेच त्याला हिंदी, इंग्रजीचे किमान ज्ञान असावे.

३. वाहनचालकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे, तसेच ५८ वर्षापेक्षा अधिक नसावे.

४. संस्थेतर्फे पुरविण्यात येणारा वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. संबंधित सर्व वाहनचालाकांचे पोलिस तपासणी अहवाल देणे बंधनकारक राहील.

५. वाहनचालकाजवळ वाहन चालविण्याची वैध अनुज्ञाप्ती /परवाना असावा तसेच त्याचे ओळखपत्र (आधार कार्ड /पॅन कार्ड/ निवडणूक ओखळपत्र) यापैकी एक त्याचेकडे असावे. तसेच वाहनचालकाची दोन छायाचित्रे व अनुज्ञाप्ती /परवान्याची झेरॉक्स प्रत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणात जमा करणे बंधनकारक राहील.

६. प्राधिकरणाच्या कार्यालयाचे कामकाज आठवड्यातील सोमवार ते शुक्रवार व अपवादात्मक परिस्थितीत सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील चालू राहील. कार्यालयीन वेळ सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.१५ अशी आहे. तथापि, वाहनचालकाच्या कामाची वेळ कार्यालयीन वेळेच्या एक तास अगोदर व एक तास नंतर (सकाळी ८.३० ते सायंकाळी ७.१५) अशी राहील.

७. मान्यवरांच्या आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त वाहनचालकास काम करणे आवश्यक राहील. अतिकालिक भत्ता हा दिवसाचे ९ तासाचे काम संपल्यानंतर १ तास संपल्यानंतर म्हणजेच १० तासानंतर लागू होईल. मुंबई बाहेरील भत्ता म्हणजे मुंबई/ नवी मुंबई (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्द) बाहेरील भत्ता रु. २५०/- प्रतिदिन राहील. रात्री १२.०० वाजल्यानंतर रु. १००/- जेवण भत्ता देय राहील.

८. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ठरवेल तसा वाहनचालकाला गणवेश देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

९. प्राधिकरणाच्या कर्तव्यावर असताना वाहनचालकाची वागणूक शिष्ट संमत असेल. (उदा. वाहनचालकाने वाहतूकीचे नियम पाळणे, वागणूक सौजन्याची ठेवणे, वाहनाजवळ उपलब्ध असणे) वाहनचालकाकडे मोबाईल असावा, तथापी वाहन चालवित असताना मोबाईलचा वापर करणार नाही याची दक्षता घ्यावी. वाहनचालकाने प्राधिकरणाच्या कामाच्या वेळेत नशापान/धुम्रपान व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करु नये. वरील नियमांच्या उल्लंघनामुळे येणाऱ्या दंडाची रक्कम ही त्यांच्या वेतनातून वजा करण्यात येईल.

१०. वाहनचालक म्हणून ज्या कामासाठी शिफारस केली आहे, ते काम सचोटीने व प्रामाणिकपणे करणे बंधनकारक राहील. वाहनचालक म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्तीचे काम समाधानकारक नाही, असे प्राधिकरणाच्या निदर्शनास आल्यास त्याला नोटीस न देता, त्याची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

११. कराराचा कालावधी १ वर्षाचा राहील. त्यानंतर करारास मुदतवाढ देणे अथवा कालावधी कमी करण्याचा अधिकारी प्राधिकरण राखून ठेवत आहे. मात्र, कराराचे पालन समाधानकार न झाल्यास करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा निर्णय महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा राहील. संस्थेस करार संपुष्टात आणवयाचा असल्यास ३ महिन्याची नोटीस देणे बंधनकरक राहील.

१२. प्राधिकरणाच्या वाहनास अपघात झाल्यास व दुर्देवाने वाहनचालकास कोणत्याही स्वरुपाची वा गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्चाची अथवा इतर नुकसान भरपाईचे कोणतेही प्राधिकरणावर असणार नाही. परंतू, वाहनाच्या विम्या संदर्भातील विमा कंपनीच्या धोरणानुसार अनुज्ञेय नुकसान भरपाई अनुज्ञेय ठरेल.

१३. वाहनचालकास त्याचेकडे सोपविलेले कार्यालयीन वाहन दुसऱ्या कोणत्याही अन्य व्यक्तीस देता येणार नाही.

१४. प्राधिकरणाच्या वाहनाची व वाहनातील Accessories ची काळजी /देखभाल वाहनचालकाने करावी. त्यास नुकसान पोहचल्यास संस्था जबाबदार राहील.

१५.वाहन प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या ठिकाणी ठेवण्याची जबाबदारी वाहनचालकाची राहील. इतर दुसऱ्या ठिकाणी वाहन पार्क करता येणार नाही. त्याकरीता प्राधिकरणाचे सचिव यांची रितसर परवानगी घ्यावी लागेल.

१६. शासकीय (प्राधिकरणाची) गोपनियता अबाधित राहील याची दक्षता वाहनचालक व संस्था घेईल.

१७. प्राधिकरण कार्यालयात कार्यरत असलेला वाहनचालक अपरिहार्य कारणास्तव गैरहजर / अनुपस्थित राहील्यास बदली वाहनचालक उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्थेची राहील. बदली वाहनचालक उपलब्ध न करून दिल्यास गैरहजर / अनुपस्थित कालावधीचे शुल्क दंडात्मक स्वरूपात संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

१८. वाहनचालकाने दररोज लॉगबूक भरणे आवश्यक आहे. तसेच वाहनामध्ये इंधन भरल्यानंतर त्याची नोंद त्याच दिवशी लॉगबूकात भरणे आवश्यक आहे. महिना अखेरीस लॉगबूकचा गोषवारा प्राधिकरण कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

१९. करारासंबंधी काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याचे कार्यक्षेत्र मुंबई राहील.

२०. सदर करार दि. ०१/०५/२०२२ ते ३१/०४/२०२३ या कालावधीसाठी राहील.

----X---